परिपत्रक नं. ६९
(जनरल विभाग)

रयत शिक्षण संस्था, सातारा
ता. १२/०१/२०१८

सर्व शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था

यांना...

विषय :- पारितोषिक रकमेबाबत. .

संस्थेच्या शाखांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीस चालना मिळावी तसेच त्यांच्या इतर कलागुणांना वाव मिळावा म्हणून ग्रामस्थ, हितचिंतक, संस्था सेवक, कार्यकर्ते पारितोषिक देण्यासाठी संस्थेकडे रक्कम देतात.सदरची रक्कम ही संस्थेमार्फत बँकेत ठेवून येणा-या वार्षिक व्याजातून १०%व्यवस्थापन खर्च वजा जाता उर्वरित रक्कम विद्यार्थ्यांना पारितोषिक म्हणून दरवर्षी देण्यात येते.बँकेचे व्याजदर दिवसेंदिवस कमी होत असल्याने यापूर्वी परिपत्रक नं.१७,ता.२९/०७/२०१५ने एका विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयांना रु. २५,०००/-व माध्यमिक व इतर शाखांना रु.११,०००/-चे पारितोषिक ठेवणेबाबत सर्व शाखांना कळविले होते. याबाबत एक्झि.कमिटीच्या ता.२३/१२/२०१७च्या बैठकीत पारितोषिकांच्या रकमेबाबत चर्चा होऊन महाविद्यालयांप्रमाणे माध्यमिक व इतर शाखांनाही एका विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यासाठी रु.२५,०००/-ची कायम ठेव स्वीकारावी असा निर्णय घेण्यात आला. तरी येथून पुढे पारितोषिकासाठी कमीत कमी रक्कम रु. २५,०००/-कायम ठेव स्वीकारावी .त्यापेक्षा कमी रक्कम कार्यालयाकडे पाठवू नये. पारितोषिक ठेवणा-या व्यक्तीकडून त्यांचा सविस्तर लेखी अर्ज (अर्जामध्ये सदर व्यक्तिचे नाव व पत्ता,पारितोषिकाची रक्कम,पारितोषिक ठेवण्याचा उद्देश,पारितोषिक कोणाच्या नावे दिले जावे?इ. तपशिल) व त्यासोबत पारितोषिक रकमेचा चेक/ डी.डी.'सचिव,रयत शिक्षण संस्था, सातारा' यांचे नावे काढून तो संस्था कार्यालयाकडे पाठवावा किंवा कायम ठेव पारितोषिक खाते नं. ४८/१ दि.रयत सेवक को-ऑप.बँक, कर्मवीर समाधी परिसर, सातारा या शाखेकडे पाठवावी व सदर चलनाची झेरॉक्स व शाखेचे पत्र व संबंधिताचा अर्ज संस्था कार्यालयाकडे पाठवावा.

सचिव,
रयत शिक्षण संस्था,सातारा

प्रत माहितीसाठी :-

१. मा.चेअरमनसाहेब ,रयत शिक्षण संस्था,सातारा
२. सहसचिव (उच्च शिक्षण / माध्यमिक विभाग),रयत शिक्षण संस्था,सातारा,
३. ऑडिटर,रयत शिक्षण संस्था,सातारा
४. सर्वश्री विभागीय अधिकारी ,रयत शिक्षण संस्था,सातारा

Dange/letter/२२